Estd:1962
NAAC 'A' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

विद्यापीठातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०४–०७–२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. २१ नुसार विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना गृहबांधणी आर्थिक अग्रीम योजना लागू करणेस मान्यता देण्यात आली आहे. यासंदर्भात तयार करण्यात आलेली नियमावली सोबत प्रमाणे जोडलेली आहे. यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 2300

दिनांक : 24 AUG 2017

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
२. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहाय्यक कुलसचिव व समकक्ष अधिकारी.
३. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
४. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, मा. प्र–कुलगुरु, कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
५. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करावे. (Intranet)

Estd :1962
'A' Re-accredited by NAAC
(2014) with CGPA – 3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

कायमस्वरुपी सेवेतील कर्मचारी / अधिकारी यांस घर बांधणी अग्रिमाची कमाल मर्यादा निर्धारित करण्यासंदर्भात नियमावलीचा मसूदा :–

| अ. क्र. | प्रयोजन | घर बांधणी अग्रिमाच्या रक्कमेची सुधारित कमाल मर्यादा |
|---|---|---|
| अ | 1. जमीन खरेदी करुन त्यावर विहित कालावधीत घर बांधणे, किंवा<br>2. स्वतःच्या मालकीच्या जागेवर नवीन घर बांधणे, किंवा<br>3. स्वतःच्या मालकीच्या जागेवरील मोडकळीस आलेले घर पाडून नवीन घर बांधणे, किंवा<br>4. बांधकाम चालू असलेले नवीन घर किंवा तयार नवीन घर खरेदी करणे. | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 200 पट किंवा रू. 20 लाख किंवा घराची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता वित्त विभागाने ठरवूण दिलेल्या मर्यादेत यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येईल. |
| ब | घर बांधण्यासाठी जमीन खरेदी करणे. | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 200 पट किंवा रू. 6 लाख किंवा जमीनीची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येईल. |
| क | स्वतःच्या मालकीची राहत्या घराचे नवीन बांधकाम करुन विस्तार करणे. (अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी एकदाही अग्रीम घेतलेले नसल्यास) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 200 पट किंवा रू. 6 लाख किंवा बांधकामाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येईल. |
| ड | सध्याचे राहते घर निवास योग्य करण्यासाठी असाधारण व विशेष स्वरुपाची दुरुस्ती करणे. (नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान पोहोचलेले घर पुनः निवारा योग्य करण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती) (राहत्या घरात नवीन सोयी किंवा अंतर्गत सजावट करणे यासाठी अनुदेय नाही.) | मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 100 पट किंवा रू. 3 लाख किंवा घर दुरुस्तीचा खर्चाची किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येईल. |
| इ | हौसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन (HDFC), राष्ट्रीयकृत बँका/सहकारी बँका, महाराष्ट्र स्टेट हौसिंग फायनान्स कार्पोरेशन व तत्सम शासनमान्य वित्तिय संस्थेकडून घरबांधणीच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी (हस्तांतरण/Takeover) | कर्मचाऱ्याने मूळ वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची रक्कम वजा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेपर्यंत कर्मचाऱ्याने सदरची परतफेड केलेली रक्कम किंवा अग्रिम मंजूर करण्याच्या तारखेला वित्तीय संस्थेला परतफेड करण्यासाठी बाकी राहिलेली रक्कम मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 200 पट किंवा रू. 20 लक्ष किंवा घराच्या किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येईल. |
| फ | जुने घर विकत घेण्यासाठी | मूल्यांकन करण्यास प्राधिकृत करण्यास आलेल्या व्यक्तीने (Authorised Valuers) दिलेल्या प्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या जुन्या घराची किंमत किंवा मूळ वेतनाच्या (वेतन बँड मधील वेतन + ग्रेड वेतन) 200 पट किंवा रू. 20 लक्ष किंवा घराच्या किंमत किंवा अग्रिम परतफेडीची क्षमता यापैकी जी कमी असेल ती रक्कम अग्रीम म्हणून अदा करण्यात येइल. |

अ. गृहबांधणी / खरेदी / गृहकर्ज हस्तांतरण / जागा खरेदी / वाढीव बांधकाम या संदर्भातील नियमाबाबतः

1. अग्रिमाची व्याजासह वसूली सेवानिवृत्तीपूर्वी पूर्ण होईल, अशा पध्दतीने वरील 'अ', 'इ' व 'फ' च्या प्रयोजनांसाठी कमाल 20 वर्षात, प्रथम 192 मासिक हप्त्यात मूळ अग्रीम व नंतर 48 मासिक हप्त्यात व्याज प्रमाणे वसूल करण्यात येईल. तसेच वरील 'ब', 'क' आणि 'ड' च्या प्रयोजनासाठी घेतलेल्या अग्रीमाची वसूली व्याजासह कमाल 96 मासिक हप्त्यात, प्रथम 72 मासिक हप्त्यात मूळ अग्रीम व नंतर 24 मासिक हप्त्यात व्याजाची रक्कम वसूल करण्यात येईल. अग्रीम धारक त्याच्या इच्छेनुसार कमी कालावधीत अग्रीम व व्याजाची रक्कम फेडण्यासाठी मासिक हप्त्याची रक्कम वाढवू शकेल.
2. अर्जदार कर्मचारी व प्रकरणपरत्वे त्याच्या / तिच्या पत्नीच्या / पतीच्या संयुक्त नावावर घर / जमीन खरेदी करावयाचे असल्यास संदर्भाधीन शासन अधिसूचना क्र. एचबीए. 1072 / 2143 / 71 / फ–1, दि. 1.1.1972 मधील तरतूदीनुसार त्यातील अटी शर्तीच्या अधिन अग्रीम मंजूर करता येईल.
3. खाजगी बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) ठेकेदार, कंपनी, सिडको, हुडको, म्हाडा, शासनाने मंजूर केलेल्या कोटयातून, इत्यादिकडून तयार सदनिका अथवा बांधकाम सुरु असलेल्या इमारतीत सदनिका खरेदी करण्यासाठी अग्रीम अनुज्ञेय राहील.
4. विद्यापीठ सेवेतील पुर्ननियुक्त माजी सैनिक असलेल्या कर्मचाऱ्याला संदर्भाधीन शासन निर्णय क्र. घबांअ.1000 / प्र.क्र. 23 / 01 / विनियम, दि. 25.09.2001 मधील तरतूदीनुसार अग्रीम अनुज्ञेय राहील.
5. अ) ज्यांना घरबांधणी अग्रीम मंजूर करावयाचे आहे, अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांची विद्यापीठ आस्थापनेवरील सेवेतील नियुक्ती संबंधित पदांच्या सेवाभरती नियमानुसार केलेली असली पाहिजे आणि अशा प्रकारे केलेल्या नियुक्तीनंतर सेवेत कायम झालेला असला पाहिजे. व कमीत कमी 5 वर्षे सेवा पूर्ण झाली असली पाहिजे. तसेच सेवेतील शेवटची 5 वर्षे शिल्लक असली पाहिजे.

   ब) गृहकर्ज मंजुरीनंतर प्रशासन / कायदा विभागाकडून गृहकर्ज प्रस्तावावर नेमणूकीबाबत व कार्यालयीन वर्तनाबाबत अहवाल प्राप्त झाल्यावर व कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच कर्जाचा पहिला हप्ता देय राहील. सदर गृहकर्ज संदर्भात प्रशासन / कायदा विभागाचा अभिप्राय गृहकर्ज मंजुरीच्या वेळी घेण्यात येईल.
6. वरील सर्व प्रयोजनार्थ संपूर्ण सेवेमध्ये फक्त एकदाच अग्रीम अनुज्ञेय होईल.
7. घरबांधणी नियम प्रयोजनातील कोणत्याही प्रयोजनासाठी अग्रीम घेण्यासाठी नोंदणीकृत गहाणखत व वैयक्तिक बंधपत्र / जामीनखत व कर्मचारी / अधिकारी यांचे पगारपत्रक तसेच शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सह. पतसंस्था यांच्याकडून कर्ज घेतले असल्यास त्यांचा नाहरकत दाखला इत्यादी कागदपत्रांची आवश्यकता राहील.
8. पती, पत्नी दोघेही विद्यापीठीय कर्मचारी असले, तरीही त्यांपैकी एकालाच (विहित मर्यादेतच) घरबांधणी अग्रीम अनुज्ञेय राहील.
9. विद्यापीठ कर्मचाऱ्यास कोल्हापूर शहरासह महाराष्ट्र राज्याच्या अन्य कोणत्याही शहरात / गावात घरबांधणीसाठी / तयार घर खरेदीसाठी / त्याच्या स्वतःच्या मूळ मालकीच्या घराच्या वाढीव बांधकामासाठी / कालांतराने घर बांधण्याच्या प्रयोजनासाठी जागा खरेदीसाठी अग्रीम देण्यात येईल, मात्र ही सवलत योजना असल्यामुळे कोणत्याही कर्मचाऱ्यास त्याच्या संपूर्ण सेवा काळात केवळ एकाच घराच्या बांधकाम वा खरेदीसाठी अग्रीम देण्यात येईल.
10. अग्रीम मंजुरीच्या आदेशाची त्याचप्रमाणे अग्रीमाची वसुली पूर्ण झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे दोन्ही बाबींची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात येईल.
11. विद्यापीठ सेवेत असताना गृहकर्ज धारकाचा मृत्यू झाल्यास रूपये -------- पर्यंतची व्याजाची रक्कम माफ करावी व मृत्यूच्या दिनांकाला असलेल्या शिल्लक मुद्दल व व्याजाची पूर्ण रक्कम त्याच्या संपूर्ण मृत्यू–नि–सेवा उपदानातून समायोजित करण्यात

यावी. त्यापेक्षा जास्त रक्कम शिल्लक राहिल्यास रुपये ------ पर्यंतचीच रक्कम क्षमापित करावी व उर्वरित एकूण रकमेवर व्याजाची पूर्ववत गणना सुरू ठेवून वसुलीबाबत कायदा विभागामार्फत आवश्यक ती कार्यवाही करू देण्यास वारसाची अनुमती राहील, असे हमीपत्र (गृहकर्ज) घेतांना करून द्यावे लागेल.

12. विद्यापीठ अधिकारी/कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला अग्रीम ज्या प्रयोजनासाठी मंजूर केलेला आहे त्याच कारणासाठी त्याचा विनियोग न केल्यास किंवा अग्रीम व व्याज परतफेडीच्या संदर्भातील अटी व शर्तीचे पालन न केल्यास किंवा त्यात कोणत्याही प्रकारे कसूर झाल्यास अग्रीमधारकाकडून अग्रीमाची रक्कम एकरकमी वसूल करण्यात येईल. याकरिता अग्रीम धारक याने मागणी वचन नोट (Demand Promissory Note) लिहून देणे आवश्यक आहे. कर्मचारी/ अधिकारी कोणत्याही कारणास्तव बडतर्फ / सेवेतून काढून टाकल्यास अग्रीम देयक वसूलीबाबत मागणी वचन नोटची तरतूद लागू राहील.

13. घरबांधणी अग्रीमावरील व्याजाची परीगणना एकरूप दराने (Uniform Rate) परंतु विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी विहित करेल त्या व्याजदराने लागू राहतील.

14. ज्या कर्मचाऱ्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असतील त्यांना अग्रीम अनुज्ञेय होणार नाही. (महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही – 2000/12, दि. 1 जूलै, 2005 अन्वये दि. 28 मार्च, 2005 पूर्वी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या कर्मचा–यांसाठी ही अट लागू होणार नाही.)

15. अ) संबंधित कर्मचाऱ्याने घराच्या किंमतीइतका घराचा विमा, शासकीय विमा संचालनालयाकडे उतरविण्यात यावा, व तो सतत चालू राहील याची संबंधित अग्रीम धारकाने दक्षता घ्यावी. प्रथम कर्जदाराच्या एकरकमी प्रिमियमचा खर्च व मंजूर अग्रीमाची एकूण रक्कम शासन निर्णयातील अग्रीम मर्यादेच्या जास्त होणार नाही, याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

ब) त्याप्रमाणे शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना अदा करण्यात आलेला ग्रहकर्ज अग्रीम रकमेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गृहकर्जदाराला स्वतःचा विमा मंजूर रकमेएवढा एकरकमी एकावेळेस असा उतरवावा, व ती पॉलीसी विद्यापीठाचे नावे अग्रेषित करावी लागेल. त्यास लागणारा विमा प्रिमियमचा खर्च कर्जदाराने करावा. त्यासाठी सदर कर्मचाऱ्यांना प्रथम हप्ता अदा केलेनंतर संबंधित कर्मचाऱ्याने विमा काढण्याची प्रक्रिया करण्यात यावी. व त्यानंतरच पुढील हप्ता देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

16. ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठ व इतर गृहकर्जसंस्थेकडून अग्रीम घेतलेले असेल व त्यांचे घर बांधून पूर्ण झालेले आहे. अशा अधिकारी / कर्मचारी यांना विद्यापीठ निवासस्थानाचा लाभ घेता येणार नाही. तथापि विद्यापीठाच्या सदनिका खाली असतील व मा. कुलगुरू महोदयांनी त्यास मान्यता दिल्यास त्या परिस्थितीत सदनिका मिळविण्याचा लाभ घेता येऊ शकेल. सदरचा नियम हा अत्यावश्यक सेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना लागू होणार नाही.

17. गृहबांधणी अग्रीमाच्या मागणीच्या अर्जावरील दोन जामीनदारांबाबत –

    a. संबंधित अग्रीमधारकाचे दोन्ही जामीनदार हे विद्यापीठ सेवेत कायम झालेले असावेत व त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची विभागीय खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केलेली नसावी.

    b. दोन्ही जामीनदारांनी स्वतंत्ररित्या हमीपत्र व शपथपत्र लिहून द्यावे की, त्यांनी किंवा त्यांच्या वारसदारांनी जामीनदार व अथवा त्यांचे वारसदार हे संबंधित गृह अग्रीमधारक कर्मचाऱ्याने गृहकर्जाची व त्याच्याशी संबंधित व्याजाची रक्कम विद्यापीठाकडे विहित मुदतीत न भरल्यास ती रक्कम भरून देण्यास हरकत नसून संमती राहील.

    c. जामीनदार मृत झाल्यास/सेवेतून निलंबित झाल्यास/विद्यापीठाने त्याची सेवा समाप्त केल्यास/सेवा निवृत्त झाल्यास/धारणाधिकाराने अन्य विद्यापीठात अथवा शासकीय सेवेत रूजू झाल्यास एक महिन्याच्या आत वरील निकष पूर्ण करणाऱ्या

जामीनदाराची जामीनदार म्हणून नोंद करून घेण्याची जबाबदारी ही उभय पक्षांची राहील. (म्हणजे विद्यापीठाचे कर्ज स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्याची जामीनदार या दोन्ही पक्षांची) राहील.

d. अग्रीम मंजूर झालेले कर्मचारी / अधिकारी यांनी विद्यापीठासोबत करार (Loan Agreement) विद्यापीठासोबत करार करणे आवश्यक तसेच त्यासोबत हमी पत्र देणे बंधणकारक. कोणत्याही कारणास्तव कर्मचारी / अधिकारी यांनी अग्रीमाची परतफेड अथवा हप्ते न भरल्यास थकीत रकमेची वसूली ही त्यांना मिळणा–या पगार व इतर भत्ता मधून कपात करून सदरची वसूली करण्यास विद्यापीठास प्रथम प्राधान्य (Preferential Right) असेल अशी हमी पत्र लिहून देणे आवश्यक आहे.

e. गृहकर्जाची परतफेड हे गृहकर्ज स्विकारणाऱ्या कर्मचाऱ्याने कुठल्याही करणाने न भरल्यास सर्वप्रथम गृहकर्ज स्विकारलेल्या व्यक्तीची स्थावर मिळकत जप्त करून त्यांचा लिलाव करण्यात येईल तसे करूनही गृहकर्ज रकमेची परतफेड न झाल्यास उर्वरित रकमेसाठी जामीनदार क्र. 1 यांच्याकडून वसुली करून त्या अंती जामीनदार क्र. 2 यांच्या कडूनही वसुली करण्यात येईल.

f. दोनही जामीनदारांपैकी जामीनदार क्र. 1 हा मालमत्ताधारक असावा व मालमत्तेची नोंद त्याच्या नावे असणे बंधनकारक आहे.

g. गृहकर्जाची वसुली ज्या महिन्यात स्थगित हाईल किंवा गृहकर्जाचा हप्ता भरणे बंद हाईल तेंव्हापासून 3 महिन्याच्या कालावधीअंती वसुलीची प्रक्रिया सुरू करण्यात येईल व ती समप्रमाणात जामीनदार क्र. 1 व जामीनदार क्र. 2 यांच्या कडून वसुल करण्यात येईल.

18. गृहकर्ज अग्रीमांच्या नोंदणीकृत गहाणखत/तारण (Registered Mortgage) करण्यासंदर्भात –

i. गृहकर्ज मंजूर रकमेचे प्रस्तावित मालमत्तेवर कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या नावाने गहाणखत/तारण (Registered Mortgage) करण्याचा व काढून घेण्याचा खर्च अधिकारी/कर्मचारी स्वःखर्चाने करावा लागेल. मात्र वर्ग–3 व वर्ग–4 या कर्मचाऱ्यांना मालमत्तेवरील बोजा काढून घेतेवेळी येणारा खर्च कर्मचारी कल्याण निधीच्या रकमेतून विद्यापीठातर्फे करण्यात येईल.

ii. गृहकर्ज हस्तांतरणासाठी मंजूर रकमेच्या अदायगी झाल्यानंतर नमूद केलेली मूळ कागदपत्रे विद्यापीठात 30 दिवसांच्या आत सादर करावीत. अन्यथा विद्यापीठाने दिलेले गृहकर्ज रक्कम + मुळ व्याजदर + 3% या दराने व्याजाची आकारणी करण्यात येईल व संपूर्ण रक्कम एकरकमी वसूल केली जाईल.

19. गृहकर्ज हस्तांतरण करण्यासंदर्भात अनुसरावयाची कार्यपध्दती / नियमावली –

i. गृहकर्जदार कर्मचाऱ्याच्या खरेदी खतावर नमूद केलेल्या रकमेपेक्षा कमी रकमेचे कर्ज संबंधित मूळ वित्तीय संस्थेने वा बँकेने मंजूर केली असेल, व ती रक्कम वजा जाता कर्मचाऱ्यास उर्वरित रक्कम अन्य मार्गाने उभी करावी लागत असल्यास, अशा प्रकरणात त्या अग्रीमधारक कर्मचाऱ्यास खरेदीखतावर नोंदविलेल्या रक्कमेतून वित्तीय संस्थेला परतफेड केलेली रक्कम वजा जाता शिल्लक रक्कम व थकीत व्याज एवढी रक्कम अग्रीम स्वरूपात अदा करण्यात यावी. **अर्थात, कोणत्याही परिस्थितीत त्या कर्मचाऱ्याला त्याच्या मालमत्तेवर विद्यापीठाव्यतिरिक्त अन्य संस्थेचे गहाणखत (व्दितीय प्रभार) निर्माण करता येणार नाही. सदर बाब प्रतिज्ञा पत्रात समाविष्ट करण्यात यावी.**

ii. कर्जदाराच्या एका घरासाठी घेतलेल्या एकाच कर्ज प्रकरणी या योजनेचा लाभ देण्यात येईल.

iii. वित्तीय संस्थेचे कर्ज कर्मचाऱ्याने स्वत: व पती/पत्नीसह संयुक्तपणे घेतलेले असेल , तरी त्याला हस्तांतरणासाठी अनुज्ञेय अग्रीम मंजूर करण्यात येईल.

20. गृहबांधणी अग्रीम मंजूरीच्या संदर्भातील अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक दस्तऐवजांच्या पूर्ततेबाबत –

कर्मचाऱ्याच्या गृहबांधणी अग्रीम मागणी सोबतचा प्रस्ताव परीपूर्ण असावा, मात्र एखाद्या अर्जदाराच्या संबंधित प्रस्तावात काही दस्तऐवजांची कमतरता असेल वा पूर्तता करणे बाकी असेल, तरीही त्याच्या अग्रीम मागणीच्या प्रस्तावाचा विचार करून नियमाप्रमाणे पात्र असल्यास मंजूर करण्यात येईल. तथापि, अग्रीम मंजूर झाल्यापासून 21 दिवसांच्या आत त्याने सर्व दस्तऐवजांची पूर्तता केल्यानंतरच त्याला मंजूर अग्रीमाची रक्कम नियमाप्रमाणे वितरीत करण्यात येईल.

21. सदरची नियमावली ही यापुढील कर्जासाठी लागु करावी. यापूर्वी अदा केलेले गृहकर्ज त्या–त्या वेळेस अस्तीत्वात असलेल्या नियमावलीनुसार कायम असून यापुढील कर्जासाठी मागील सर्व नियमावली रद्द समजावीत.

22. गृहबांधणी अग्रीम वाटपासंदर्भात व नोंदणीकृत गहाणखत करण्याच्या प्रक्रियेसंदर्भातील अन्य नियम –

i. कर्ज वाटपाची प्रणाली व नोंदणीकृत गहाणखत (Registered Mortgage Deed) बाबत –

a. कर्मचाऱ्यास बिल्डरकडून जागा घेऊन घर / फ्लॅट बांधावयाचा असल्यास वा बिल्डरकडून घ्यावयाच्या घर/फ्लॅट संदर्भात प्रारंभी कर्मचाऱ्यास मंजूर अग्रीमापैकी 40 टक्के रक्कम अदा करण्यात येईल. त्यानंतर संबधित कर्मचाऱ्याने ती जागा विद्यापीठास तारण केल्यासंदर्भात Sale Deed व्दारे Registered करून दिल्यावर व स्वतंत्र विमा एकरकमी कर्ज रकमेएवढा दिल्यानंतर उर्वरित रक्कम टप्याटप्याने देण्यात येईल.

b. तयार घर खरेदी करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रारंभी 90% रक्कम अदा करण्यात येईल व त्यानंतर त्याने 30 दिवसांच्या आत संबंधित मालमत्ता विद्यापीठाच्या नावे नोंदणीकृत गहाणखत (Registered Mortgage Deed) करून दिल्याचे दस्तऐवज, पुरावे व विमा स्वतःचा सादर केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यास उर्वरित 10% रक्कम अदा करण्यात येईल.

c. ज्या कर्मचाऱ्याची स्वतःची जागा असेल व त्यावर तो घर बांधत असेल, त्या परिस्थितीत त्याने प्रारंभी अनुज्ञेय अग्रीमाच्या मंजूर रकमेएवढा बोजा त्या जागेवर विद्यापीठाच्या नावाने नोंदणीकृत गहाणखत (Registered Mortgage Deed) व्दारे करून दिल्यानंतर त्याचे दस्तऐवज, पुरावे व स्वतःचा विमा सादर केल्यानंतर बांधकामाच्या टप्प्यानुसार अनुज्ञेय अग्रीमाची रक्कम मंजुर करण्यात येईल.

d. गृहकर्जाचे हस्तांतरण करताना संबंधित बॅक वा संस्थेकडील त्या कर्मचाऱ्याच्या शिल्लक रकमेएवढा अग्रीम विद्यापीठाव्दारे संबंधित बॅक/संस्थेला रक्कम अदा करण्यासाठी अग्रीम अदा करण्यात येईल. व त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने 30 दिवसांच्या आत संबंधित मालमत्तेवर विद्यापीठाच्या नावाने नोंदणीकृत गहाणखताव्दारे (Registered Mortgage Deed) तारण करून दिल्यानंतर त्याचे दस्तऐवज व पुरावे सादर करावेत. व स्वतःचा विमा सादर करावा लागेल.

e. यापूर्वीच घरबांधणीसाठी अग्रीमाची रक्कम घेऊन संबंधित मालमत्ता विद्यापीठाकडे गहाण ठेवलेल्या कर्मचाऱ्याने त्याच घराच्या विस्तारीकरणासाठी अग्रीम मागितला असेल, त्यापरिस्थितीत सदर कर्मचाऱ्यास वाढीव मंजूर कर्जाच्या 90 टक्के रक्कम बांधकामाच्या टप्प्यानुसार अदा करण्यात येईल व वाढीव रकमेएवढे तारणाचे दस्तएवेज, व स्वतःचा विमा सादर केल्यानंतर त्यास उर्वरित 10% रक्कम अदा करण्यात येईल.

f. उपरोक्त कोणत्याही स्थितीत कर्मचाऱ्याने दिलेल्या मुदतीत त्याची संबंधित मालमत्ता विद्यापीठाकडे नोंदणीकृत गहाणखत (Registered Mortgage Deed) व्दारे करून दिल्यानंतर त्याचे दस्ताऐवज व पुरावे सादर केले नाहीतत, तर त्याला मंजूर व अदा केलेल्या अग्रीमाची संपूर्ण रक्कम + गृहकर्ज व्याजदर + 3% टक्के व्याजदराने दंडासह वसूल करण्यात येईल.

g. कर्मचाऱ्यास बांधकाम कंत्राटदाराचा (बिल्डर) कडून बांधकाम झालेले (Ready Possession Block) घर संपूर्ण दस्तऐवजासह तयार स्थितीत विकत घ्यावयाचे असल्यास आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची (मंजूर ले आऊट, नगरपालिका बांधकाम परवाना, सौदा पावती इत्यादी) पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार मंजूर कर्जाच्या 90% रक्कम संबंधित कर्मचाऱ्याच्या नावे एकरकमी देण्यात येईल. व त्यानंतर त्याने 30 दिवसांच्या आत संबंधित मालमत्ता विद्यापीठाच्या नांवे नोंदणीकृत गहाणखत (Registered Mortgage Deed) करून दिल्याचे दस्ताऐवज, पुरावे व स्वतःचा विमा सादर केल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यास उर्वरित 10% रक्कम अदा करण्यात येईल.

h. निव्वळ जागा खरेदीसाठी अग्रीम मागणाऱ्या कर्मचाऱ्यास त्याच्या मंजूर रकमेच्या 90% रक्कम प्रारंभी अदा करण्यात येईल व त्याने मूळ खरेदीखत व गहाणखत सादर केल्यानंतर उर्वरित 10% रक्कम अदा करण्यात येईल.

ii. गृहकर्जाचे हस्तांतरण व वाढीव बांधकाम अशा संयुक्त प्रकरणी संबंधित बँक वा संस्थेकडील त्या कर्मचाऱ्याच्या शिल्लक रकमेएवढा अग्रीम विद्यापीठाव्दारे संबंधित बँक / संस्थेला रक्कम अदा करण्यासाठी अग्रीम अदा करण्यात येईल व त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने 30 दिवसांच्या आत संबंधित मालमत्तेवर विद्यापीठाच्या नावाने नोंदणीकृत गहाणखताव्दारे (Registered Mortgage Deed) तारण करून दिल्यानंतर त्याचे दस्ताऐवज व पुरावे सादर केल्यानंतर उर्वरित अग्रीम बांधकामाच्या टप्प्यांच्या अनुषंगाने विद्यापीठ अभियंत्यांच्या अभिप्रायानुसार अदा करण्यात येईल.

iii. कर्मचारी स्वतःचे अथवा कंत्राटदाराकडून घराचे बांधकाम करू इच्छित असेल तर बांधकामाच्या टप्प्यानुसार 40% असल्याबाबतचा अभिप्राय दिल्यानंतर अदा करण्यात येईल व उर्वरित 10% रक्कमही संबंधित शासकीय प्राधिकरणाकडून (नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज संस्था, ग्राम पंचायत इ.) यांचेकडून भोगवटा प्रमाणपत्र (Completion Certificate) सादर केल्यानंतर अदा करण्यात यावी. याबाबत कर्मचाऱ्यास त्याच्या घराचे भोगवटा प्रमाणपत्र (Completion Certificate) मिळण्यास संबंधित महानगरपालिका वा स्थानिक स्वराज्य संस्थेकडून अडचण निर्माण होत असल्यामुळे त्यास भोगवटा प्रमाणपत्राची सक्ती न करता अशा प्रकारांमध्ये विद्यापीठाच्या बांधकाम विभागाकडून नियुक्त केलेल्या अभियंत्याव्दारे संबंधित वास्तू राहण्यास योग्यतेची मंजूर प्लॅननुसार असल्याचे प्रमाणित करून तसे प्रमाणपत्र मिळाल्यावर त्यास उर्वरित 10% रक्कम अदा करण्यात यावे व त्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांनी 3 वर्षात आणून देणे त्यास बंधनकारक राहील.

23. गृहकर्ज वितरित करताना प्राप्त अर्जामधून अनुक्रमे वर्ग–4 व वर्ग–3 च्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

24. गृहकर्ज वितरित करताना दीव्यांग कर्मचाऱ्यांना / अधिकारी यांस प्राधान्य देण्यात येईल.

25. ज्या कर्मचाऱ्यांना **एकच मुलगी अथवा दोन मुली** असल्यास अशा कर्मचाऱ्यांना प्राधान्यक्रमाने घरकर्ज देण्यात यावे. तसेच, ज्या सेवकांना दोन पेक्षा जास्त अपत्य असतील अशा सेवकांचा प्राधान्यक्रम शेवटी राहिल.

26. सदर सेवकांच्या प्रस्तावाची तांत्रिक बाब तपासण्याचे काम विद्यापीठातील अभियांत्रिकी विभागाने करून स्थावरबाबत आपला अभिप्राय द्यावा. तसेच, आवश्यकतेनुसार सदर बांधकामास प्रत्यक्ष भेट (Site Visit) व Completion Certificate देणे आवश्यक आहे.

27. घरबांधणी अग्रिम घेतलेल्या सेवकाचा सेवेमध्ये असताना आकस्मिक मृत्यू झाल्यास अशा सेवकाच्या घरकर्ज अग्रिमावर असणाऱ्या व्याजामधील काही रक्कम माफ करण्यात यावी. सदर रक्कम किती असावी याबाबत व्यवस्थापन परिषदेसमोर धोरणात्मक निर्णयासाठी विषय ठेवण्यात यावा.

**अ) नवीन घरबांधणी अग्रिम कर्जासाठी अत्यावश्यक मूळ कागदपत्रे.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| 1 | 7 / 12 चा अद्यावत उतारा (स्वतःच्या / पत्नीचे / पतीचे नावाचा). |
| 2 | बिनशेती परवाना. (एन. ए. परवानगी पत्र). |
| 3 | मंजूर नकाशा |
| 4 | बांधकाम परवानगी पत्र. |
| 5 | टायटल रिपोर्ट (सर्च रिपोर्ट) |
| 6 | हक्कपत्रक (ड–पत्रक) |
| 7 | मंजूर ले–आऊट. |
| 8 | सोसायटी मार्फत प्लॉट असल्यास आवंटित केलेले पत्र. |
| 9 | दोन जामीनदारांचे जामीनपत्र. |
| 10 | बांधकामाचे अंदाजपत्रक. |
| 11 | प्लॉट सामाईक असल्यास ना–हरकत प्रमाणपत्र. |
| 12 | खरेदी खत. |

**ब) घरकर्ज हस्तांतरणासाठी अत्यावश्यक कागदपत्रे :–**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| 1 | मूळ वित्तीय संस्थेकडून / बॅंकेकडून घेतलेल्या कर्जापैकी परतफेड केल्यानंतरच्या कर्जाच्या मुद्दलासह व्याजाची रक्कम (Outstanding Amount) दर्शविणारा संस्था / बॅंक यांचेकडील मुळ दाखला सादर करणे आवश्यक राहिल. |
| 2 | घरकर्ज हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उपरोक्त अ.क्र. 1 ते 12 वरील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या सत्यापित प्रती. |
| 3 | घरकर्ज हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर वरील प्रमाणे सर्व मूळ कागदपत्रे 30 दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक राहिल. |

| श्री. व्ही.टी.ढवळे | डॉ. व्ही.बी.ककडे | डॉ. डी.टी. शिर्के |
|---|---|---|
| निमंत्रित सदस्य | सदस्य | मा अध्यक्ष |